दै. प्रजावाणी दि. 03-09-24

# अवैध धंद्याविरूध्द अर्धापूर पोलीसांची कडक कारवाई

वार्ताहर : अर्धापूर

पोळा सणाच्या मुहूर्तावर अर्धापूर पोलीसांनी अवैध धंद्याविरूध्द कडक मोहीम राबविली असून अर्धापूर पोलीस ठाणे हद्दीतील विविध ठिकाणी धाडी टाकून अवैध दारु विक्रेते, धाबा चालक यांच्याकडून देशी दारु, विदेशी दारुसह दारूची वाहतूक करणारी वाहने असा साडेतीन लाखांचा माल जप्त केला आहे.

नांदेड परिक्षेत्रासाठी पोलीस उप महासंचालक शहाजी उमाप रूजू झाले आणि नांदेड जिल्ह्यातील सर्वच अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले. पोळा सणाच्या मुहूर्तावर सोमवारी (दि. दोन) पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचे आदेशाने नांदेड जिल्हयात ऑपरेशन फ्लॅश आऊट राबविणे सुरू झाले. यात अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे, उप विभागीय पोलीस अधिकारी डॅनिअल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली अर्धापूर पोलीस ठाणे हद्दीतील विविध ठिकाणी धाडी टाकून पोलीस निरिक्षक चंद्रशेखर कदम आणि त्यांच्या टिमने अवैध देशी-विदेशी दारू विक्री आणि धाबे चालकावर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून एक दुचाकी आणि एक चार चाकी वाहनासह देशी - विदेशी दारू असा एकूण तीन लाख ५० हजार ९५५ रूपयांचा माल जप्त केला आहे.

या धा[illegible]ी कार्यवाहीसाठी जमादार आडे, मन्मथ नरवांडे, पोलीस नाईक संदिप आनेबोईनवाड, पोलीस शिपाई महेंद्र डांगे, कदम, महिला पोलीस कर्मचारी इंदुताई गवळी यांचे एक पथक मागील काही दिवसांपासुन पोलीस ठाणे हद्दीत ऑपरेशन फ्लॅश आऊट मोहीम राबवित आहेत. अवैध दारू विक्रेत्यांविरूध्द आजपावेतो एकुण सात लोकांविरुध्द कार्यवाही करुन गुन्हे दाखल केले आहेत.

नांदेड शहरासह जिल्ह्यामध्ये अवैध धंद्यांनी डोके वर काढले आहे. पोलिसांच्या अकार्यक्षमतेवरती नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. मात्र नव्यानेच रुजू झालेले पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार हे

## पोळा सणाच्या मुहूर्तावर साडेतीन लाखांचा माल जप्त



अवैध धंद्यासंदर्भात ॲक्शन मोडवर आल्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. सोमवारी पोळा हा सण जिल्हाभरात उत्साहात साजरा करण्यात आला. मात्र अर्धापूर तालुक्यामध्ये पोळ्याच्या सणाच्या दिवशी पोलिसांनी अवैध धंद्याविरोधात कारवाई केली आहे. पोलीस निरिक्षक चंद्रशेखव कदम आणि त्यांच्या टीमने दिवसभरामध्ये ५० हजार ९५५ रूपयांची अवैध देशी-विदेशी दारू जप्त केली आहे.